
जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in


६२ ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

मो. : ८२६२०५६४८० ☎ (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

सौ. सुनंदा एस. चोरडिया



❖ वर्ष ५१ वे ❖ अंक ४ था ❖ डिसेंबर २०१९ ❖ वीर संवत २५४६ ❖ विक्रम संवत २०७६


या अंकात पान नं.


- जैन जागृति सुवर्ण महोत्सव सोहळा १५
- कव्हर तपशील २४
- अंतिम महागाथा – १२ – भिक्षू नहीं कुबेर है ३१
- मृत्यु को महोत्सव बनाएँ : अंतिम पल की प्रार्थना ३३
- अन्तरंग शत्रु–जय : ५ मान ३५
- सफल होना है तो : कामयाबी की कुंजी ४१
- आत्म ध्यान : २ – क्यों करें ध्यान ४३
- ऐसी हुई जबगुरु कृपा : औरत सूं हेत ना कर ५१
- आनंद दरबार, कात्रज–पुणे ६३
- अ.भा.सम्रग जैन संप्रदाय तुलनात्मक तालिका २०१९ ६४
- बच्चों को सौंपी धार्मिक सस्कारों की बिरासत ६८
- श्री. विजयकांतजी कोठारी–पुरस्कार ७१
- जैन NRI मेट्रीमोनीयल मीट, पुणे ७२
- जैन फुलराणी, मुंबई ७२
- अरिहंत सोशल ग्रुप, पुणे ७३
- जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय महिला अधिवेशन, पुणे ७५
- फ्लेमिंगो ट्रान्सवर्ल्ड प्रा. लि., पुणे ७६
- चित्रकार कु. प्रणिता बोरा, अहमदनगर ७६
- श्री. रतीलाल चोरडिया–अमृत महोत्स ७७
- उधारी बंदच करा ७७
- रतनलाल सी बाफना ज्वेलर्स, पुणे ७९
- "वीरत्थुई" राष्ट्रीय संगोष्ठी, चेन्नई ८०
- दादावाडी, पुणे – नव्वाणु भाव यात्रा ८१
- सिंहगड सुष्टीत हुर्डा महोत्सव ८२
- श्री. पोपटशेठ ओस्तवाल, पुणे – निवड ८२
- सुर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, पुणे ८३

● संघवी विमलचंद वेदमुथा, पुणे ८४
● श्री. जे. के. संघवी–ठाणे ८४
● जे. जे. हेल्थ व केअर फाऊंडेशन, पुणे ८५
● वाचकांचे मनोगत ९१
● लोकविश्रुत वर्धमान महावीर ९५
● हास्य जागृति ९६
● शांती का जीवन कैसे जिये ? ९७
● जैन समाज के नव निर्वाचित विधायक ९८
● जागृत विचार १०१
● भारतीय जैन संघटना, पुणे १०४
● प्लॅस्टीक सर्जरी शिबीर, पुणे १०४
● भारत सरकार राष्ट्रीय जनगणना – २०२१ १०५
● विविध धार्मिक, सामाजिक व राजकीय बातम्या


**जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर** ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |

या अंकाची किंमत ५० रुपये.

● www.jainjagruti.in
● www.facebook.com/jainjagrutimagazine

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

● वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.

● आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / **RTGS / SBI Online / Jain Jagruti Website** इत्यादी द्वारा पाठवावी.

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**

**Bank : STATE BANK OF INDIA** **Branch : Market Yard, Pune 37.**

**Current A/c No. : 10521020146** **IFS Code : SBIN0006117**


'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२–१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia



टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

टिप : जैन जागृति अंकात प्रकाशित लेख, बातम्या, जाहिरातीचे सर्वाधिकार सुरक्षीत आहेत.

# ''जैन जागृति''चा सुवर्ण महोत्सव सोहळा ठरला अविस्मरणीय दिग्गजांची मांदियाळी : ५० वर्षांचा कार्याला ऐतिहासिक उजाळा

पुणे, दि. २० ऑक्टोबर : 'जैन जागृति' ने काळाची पावले ओळखत आपले अखंडत्व जपले आहे. संपादक संजय कांतिलाल चोरडिया आणि सौ. सुनंदा चोरडिया यांनी त्यांना 'जैन जागृति'चे संस्थापक-संपादक कांतिलालजी चोरडिया यांनी दिलेला वारसा लिलया जपला आहे आणि याच त्यांच्या कार्याचे पर्यवसन डायमंड आणि प्लॅटिनम ज्युबलीत होणार असून या ऐतिहासिक सोहळ्याचे देखील आपण सर्वजण साक्षीदार ठरणार आहोत, चोरडिया परिवाराच्या तिसऱ्या पिढीकडून हा इतिहास नक्कीच जपला जाईल, असे प्रतिपादन अखिल भारतीय श्वेतांबर स्थानक जैन कॉन्फरन्सचे अध्यक्ष श्री. पारसजी मोदी यांनी केले.

'जैन जागृति' चा सुवर्णमहोत्सव पुण्यातील सिद्धी गार्डन्स आणि बँक्वेट्स येथे दिमाखदार सोहळ्यात पार पडला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून श्री. पारसजी मोदी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर श्री. विजयकांतजी कोठारी (प्रेसिडेंट -सकल जैन संघ, पुणे), श्री. शांतिलालजी मुथ्था (भारतीय जैन संघटना), श्री. रतनकुमार हेमराजजी कटारिया (भारत वुलन हाऊस), श्री. सतीशजी सुराणा (ट्रस्टी - क्षेत्रपाल प्रतिष्ठान, गुरू आनंद तीर्थ), श्री. शांतिलालजी कटारिया (व्हाईस प्रेसिडेंट - क्रेडाई नॅशनल), श्री. राजेशजी सांकला (चेअरमन - जितो रेस्ट ऑफ महाराष्ट्र), श्री. अचलजी जैन (प्रेसिडेंट - जैन युवक महासंघ), श्री. विजयजी भंडारी (व्हाईस प्रेसिडेंट - जितो ॲपेक्स), राजेंद्रजी बाठिया (माजी प्रेसिडेंट - पूना मर्चंट चेंबर), श्री. चकोरजी गांधी (बिझनेस कोच) आणि श्री. प्रवीणजी चोरबेले (नगरसेवक - पुणे मनपा) उपस्थित होते.

तसेच पूना मर्चन्ट चेंबर्सचे अध्यक्ष श्री पोपटलालजी ओस्तवाल, ओसवाल बंधू समाजचे अध्यक्ष श्री. वालचंदजी संचेती, सचिव श्री. जवाहरलाल बोथरा, सदस्य श्री. सतीशकुमारजी बाफना, श्री. सुभाषजी तालेरा, जैन कॉन्फरन्स महिला अध्यक्ष सौ. विमल बाफना, सौ. राजश्री पारख, कुमार प्रॉपर्टीजचे श्री. केवलचंदजी जैन, जैन कॉन्फरन्सचे श्री. अशोकजी पगारीया, श्री. विलासजी लोढा, मा. नगरसेवक श्री. अभयजी छाजेड, अरिहंत जागृतिचे मंच चे अध्यक्ष श्री. राजेंद्रजी सुराणा, श्री. श्रीपालजी ललवाणी व सर्व सदस्य, जितो पुणेचे अध्यक्ष श्री. कांतीलालजी ओसवाल, उद्योगपती श्री. माणिकचंदजी दुगड, श्री. बाळासाहेब कोयाळीकर , सन्मति तीर्थच्या डॉ. नलिनी जोशी, संचेती ट्रस्टचे श्री. अभयजी संचेती, क्षेत्रपाल प्रतिष्ठानचे श्री. सुभाषजी मुथा, श्री. विलासजी पालरेषा, सॉलिटेयरचे श्री. अशोक चोरडिया, सिध्दी फाऊंडेशनचे श्री. मनोज छाजेड, श्री. ललीत शिंगवी इ. विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच जैन जागृतिचे जाहिरातदार, लेखक, पत्रप्रचारक, स्नेहीजन, मित्रपरिवार इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

'जैन जागृति'च्या सुवर्णमहोत्सव सोहळ्याची सुरुवात मंगलाचरणाने झाली आणि त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन झाले. यानंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचा 'जैन जागृति'चे संपादक संजयजी चोरडिया, प्रवीणजी चोरडिया आणि सागरजी चोरडिया यांच्या हस्ते मंगल माळ, शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी सागरजी चोरडिया यांनी उपस्थित

मान्यवरांचा परिचय आणि 'जैन जागृति'च्या कार्यक्रमाचे प्रयोजन 'उपस्थितांना करून दिले. सागरजी चोरडिया यांनी सांगितले की, जैन धर्माच्या चार संप्रदायांतील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा बातम्यांच्या आणि लेखांच्या माध्यमातून गेल्या ५० वर्षांत 'जैन जागृति'तून घेतला गेलेला आढावा आजच्या कार्यक्रमाचे यश आहे. या मासिकाच्या माध्यमातून समाजातील अनेक जणांना एक सकारात्मक ऊर्जा देण्याचे काम चोरडिया परिवाराकडून केले गेले आहे. 'जैन जागृति'हे केवळ एक मासिक नाही, तर ते समाजबांधवांसाठी प्रमुख व्यासपीठ बनले आहे. या मासिकामध्ये प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर संपादक संजय आणि सुनंदा चोरडिया यांची बारकाईने नजर असते. लेखाचा किंवा बातमीचा प्रत्येक ड्राफ्ट हा अत्यंत कुशलतेने संपादक हाताळतात आणि नंतरच मासिकात प्रकाशित केले जाते. या मासिकाच्या माध्यमातून व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक जैन मान्यवर संजय चोरडिया यांच्याशी जोडले गेले आहेत. ब्लॅक ॲण्ड व्हाईटच्या जमान्यापासून या अंकाची सुरुवात झाली आणि आज डिजिटलायजेशनपर्यंत या अंकाचा प्रवास यशस्वीरीत्या झाला आहे.

जैन जागृतिची www.jainjagruti.in ही वेबसाईट आहे. या वेबसाईटला अपडेट करण्यासाठी इंजिनिअर हायर करण्याचं जेव्हा ठरलं तेव्हा माझी मम्मी म्हणजे सुनंदाजी चोरडिया म्हणाल्या की ''इंजिनिअर हायर करण्याऐवजी मीच आपली वेबसाईट अपडेट करणार. मला पण काही तरी नवीन शिकायला मिळेल. एके काळी कॉम्प्युटरचं काहीही नॉलेज नसताना सुनंदाजी आज वेबसाईट अपडेट करण्यावर बारकाईने लक्ष देतात. त्यामुळे परदेशातही या अंकाला चांगली प्रसिध्दी आणि मान्यता आहे, हे या अंकाचे विशेष आहे. सुवर्णमहोत्सव वर्षाच्या ऐतिहासिक क्षणाचे आपण सर्व साक्षीदार आहोत, ही भाग्याचीच गोष्ट आहे.

सुवर्णमहोत्सव सोहळ्याच्या कार्यक्रमातील व्यासपीठावरील मान्यवरांनी यावेळी आपली मनोगते व्यक्त केली. पुणे मनपाचे नगरसेवक प्रवीणजी चोरबेले म्हणाले की गेल्या ३०-३५ वर्षांपासून 'जैन जागृति' या मासिकाशी आणि मासिकाचे संपादक संजय चोरडिया यांच्याशी माझे ऋणानुबंध अबाधित आहे. 'जैन जागृति'चे संस्थापक आणि संपादक कांतिलालजी चोरडिया यांनी या अंकाची सुरुवात पन्नास वर्षांपूर्वी केली. मात्र या अंकाच्या मूळ स्वरूपासह नावीन्य जपत आजच्या संपादकांनी म्हणजे संजय चोरडिया यांनी केलेले बदल उल्लेखनीय आहे. आजच्या काळात एखाद्या मासिकाची सातत्यता, अलौकिकता आणि धर्माचे सत्व जपणारे मासिक अभावानेच पाहायला मिळत असेल. जैन धर्मातील विशेष घडामोडींचा आढावाच या कव्हरमधून प्रतित होत जातो. याबरोबरच अंकातील लेख, सकल जैन समाजाला एकत्र आणून त्या दृष्टीने या अंकातील लेखकांचे महत्त्व, महिलांना लेखनासाठी मिळालेले व्यासपीठ अशा अनेकविध विषयांबरोबरच संपूर्ण महिन्यातील जैन धर्माशी निगडित असलेल्या बातम्या, विद्यार्थ्यांना किंवा विशेष व्यक्तींना मिळालेले पुरस्कार यांची दखल अंकात आवर्जून घेतली जाते. याच अंकापासून दिवाळीच्या आगमनाची देखील आपल्याला अंकातून जाणीव होते. जैन धर्मशास्त्राप्रमाणे दिवाळी पूजनविधी हे अंकाचं खास वैशिष्ट्य आहे. जैन धर्म, जैन धर्माचे संस्कार आणि ते समाज बांधवांमध्ये रुजवण्यासाठी संपादक संजय चोरडिया आणि त्यांच्या पत्नी सुनंदा चोरडिया या अंकाच्या माध्यमातून करीत आहेत आणि पन्नास वर्षांचा हा सुवर्णमहोत्सव याच यशाचे साफल्य आहे. आज पन्नास वर्षांच्या या कार्याचा 'सुवर्ण' लेख 'जैन जागृति'धर्माच्या 'जैन जागृति'चा अनुबंध आहे आणि

हा अनुबंध हीरकमहोत्सवाकडे यशस्वी वाटचाल करणार आहे, याच्या खात्रीसह संजय चोरडिया आणि सौ. सुनंदा चोरडिया यांना शुभेच्छा देत आहे.

पूना मर्चंट चेंबरचे माजी अध्यक्ष राजेंद्रजी बाठिया यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, 'जैन जागृति' हे संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेले जैन समाजाचे मासिक आहे. याचे संस्थापक-संपादक स्व. कांतिलालजी चोरडिया यांनी या अंकाचे विशेष स्थान समाजात निर्माण केले आणि सध्याचे संपादक त्यांचे चिरंजीव संजय आणि सून सुनंदा चोरडिया यांनी या मासिकाला शिखरावर नेऊन ठेवले आहे. 'जैन जागृति'च्या वाचकांना या निमित्ताने एक आध्यात्मिक अनुभूती मिळते. या मासिकातील जैन तीर्थक्षेत्रांची माहिती हे नकळत वाचकांना तेथील यात्राच घडवून आणते. संजय चोरडिया यांचा श्रद्धाभाव आणि धर्माशी निगडित असलेले त्यांचे निरंतर अधिष्ठान हा त्यांना मिळालेला वारसा आहे आणि तो त्यांनी पुढच्या पिढीकडेही दिला आहे. त्यांची कन्या स्नेहा ही आमची सून आहे आणि तिने देखील दोन्ही घरांचा ऋणानुबंध आपल्या संस्कारातून जपला आहे, हे चोरडिया घराण्याचे विशेषत्व आहे. संजय चोरडिया यांचे चिरंजीव सागर आणि सून प्राची यांना भारतात तर सन्मान मिळाला आहेच; पण अमेरिकेच्या व्हाईट हाऊस मध्ये देखील असाच सन्मान त्या दोघांचा व्हावा असे बाठिया यांनी यावेळी आशीर्वाद देत, 'जैन जागृति'च्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मान्यवरांच्या या मनोगतानंतर संजय आणि सुनंदा चोरडिया यांच्या स्नुषा प्राचि चोरडिया यांनी कृतज्ञताभाव व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, चार वर्षांपूर्वी चोरडिया घराण्याची सून म्हणून माझा या घरात प्रवेश झाला आणि 'जैन जागृति'शी एक वेगळा ऋणानुबंध निर्माण झाला. अमेरिकेतील 'गुगल'मध्ये त्या कार्यरत आहेत. येथील इंजिनिअरिंग डिरेक्टरशी त्यांचा संवाद झाला त्यावेळची आठवण त्यांनी यावेळी सांगितली. हे डिरेक्टर 'जैन जागृति' मासिकाशी परिचित असून, लहानपणापासून हा अंक नित्य वाचत आले आहेत. 'जैन जागृति'च्या संपादकांच्या प्राचि या सून आहेत, हे कळल्यावर त्यांनी आनंद व्यक्त केला. प्राचि यांनी पुढे सांगितले की, कॅलिफोर्नियातील जैन मंदिरांमध्ये त्या जातात त्यावेळी 'जैन जागृति'ची चर्चा होते आणि त्यावेळी ही बाब अभिमानास्पद वाटते. अमेरिकेत वीरायतन आचार्य चंदनाजी म. सा. यांची भेट झाली. त्यांचा स्व. कांतिलालजी चोरडिया यांच्याशी परिचय होता.

जैन जागृति व चोरडिया परिवाराबद्दल त्या अत्यंत आपुलकीने व प्रेमाने बोलल्या. मला व सागरला आशिर्वाद दिले. 'जैन जागृति'च्या सुवर्णमहोत्सव सोहळ्यास त्यांनी शुभसंदेश दिला आहे. 'जैन जागृति' हे मासिकातील जैन मॅट्रोमोनी पासून जैन 'सोशिॲलिझम'पर्यंतचे अनेक विषय हे मांडणीसह त्यांच्या वैशिष्ट्यांसह वेगळेपण जपत आहेत. अमेरिकेतही या अंकाची जैनबांधवां मध्ये 'क्रेझ' आहे, हे अंकाचे विशेष आहे.

जितो रेस्ट ऑफ महाराष्ट्रचे चेअरमन श्री. राजेशजी सांकला यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, राजेशजी सांकला पुण्यातील दगडूशेठ गणपती मंदिराचे रचैते आहेत. त्यामुळे त्यांनी 'जय गणेश' असे म्हणत चोरडिया कुटुंबाचे गणपतीशी असलेले नाते स्पष्ट केले. चोरडिया घराणे हे मूळचे अष्टविनायकांपैकी एक असलेल्या रांजणगावचे आहे, त्यामुळे बुद्धीच्या देवतेचा वरदहस्त या कुटुंबाच्या माथ्यावर सदैव आहे.'जैन जागृति'च्या माध्यमातून ते सातत्याने दिसून येत आहे. या अंकाचे गेल्या ५० वर्षातील अगदी कागदापासूनचे बदल देखील उल्लेखनीय असून आजच्या डिजिटलायजेशनच्या युगातही त्यांनी स्वीकारलेले बदल उल्लेखनीय आहेत. उत्तरोउत्तर अंकाची अशीच प्रगती होवो, अशा शुभेच्छा यावेळी त्यांनी दिल्या.

जैन युवक महासंघाचे प्रेसिडेंट अचल जैन यांनी आपल्या आठवणी व्यासपीठावरून सांगितल्या. ते म्हणाले की, २५ वर्षांपूर्वी 'जैन जागृति'चा रौप्य महोत्सव अशाच भव्य स्वरूपात साजरा केला गेला. त्यावेळी मी सूत्र संचालक म्हणून होतो. आज मी मान्यवर म्हणून या ठिकाणी उपस्थित आहे, स्व. कांतिलालजी चोरडिया यांचा एक शिक्षक, प्राध्यापक ते संपादक हा प्रवास सोपा नाही. त्यामागे अपार कष्ट आहेत. सायकलवरून त्यांनी'जैन जागृति'च्या अंकासाठी सभासद मिळवले. गावोगावी जाऊन 'जैन जागृति'च्या आणि जैन धर्माचा प्रचार आणि प्रसार केला आहे. जैन धर्माच्या चारी संप्रदायांना बांधून ठेवण्याचे काम त्यांनी केले आहे. कांतिलालजी चोरडिया यांच्यानंतर या अंकाची धुरा संजय चोरडिया यांनी स्वीकारली आणि एकदा त्यांना सहज म्हणालो की अंकातील सगळ्याच गोष्टी खूप चांगल्या आहेत, मांडणीही चांगली आहे; पण अंकाचा कागद पिवळसर चांगला नाही वाटत. या गोष्टीची दखल संजय चोरडिया यांनी लगेच घेतली आणि पुढच्याच महिन्याचा अंक हाती आला तो पांढऱ्याशुभ्र कागदावर मांडणी केलेला. बदल ही काळाची गरज आहे, आणि संजय चोरडिया यांनी त्याला न्याय दिला आहे. आज अंकाच्या स्वरूपावरूनच ते सहज लक्षात येते आहे. महावीर जयंतीला 'अहिंसा रॅली'चे आयोजन केले जात होते. समाजाच्या बांधीलकीचे ते एक सुंदर प्रतिक आहे आणि या रॅलीची कल्पना आणि नियोजन सर्वस्वी संजय चोरडिया यांचे होते.

'जैन जागृति'च्या सुवर्णमहोत्सव सोहळ्याला शुभेच्छा देण्यासाठी महाराष्ट्रातूनच नाही तर देश-विदेशांतून शुभेच्छापत्र आले. त्यातील महत्त्वाच्या दोन पत्रांचे वाचन संपादक संजय आणि सुनंदा चोरडिया यांच्या कन्या स्नेहा बाठिया यांनी यावेळी केले. यातील पहिले शुभेच्छापत्र आचार्य श्री रत्नसेनसुरीजी म. सा. यांचे आहे. त्यांनी म्हटले आहे की, 'जैन जागृति'हे मासिक अखंडपणे प्रत्येक महिन्याला नियोजित वेळेनुसार मिळते. धार्मिकता, संस्कार आणि वीतरागत्व या अंकाने जपले आहे. दुसरे शुभेच्छापत्र प. पू. प्रवीणऋषिजी म. सा. यांचे आहे. त्यांनी म्हटले आहे की, स्व. कांतिलालजी चोरडिया यांनी सुरू केलेले 'जैन जागृति' हे मासिक जैन धर्म आणि समाजबांधव यांना साधणारा सेतू आहे. 'जैन जागृति' मासिक महाराष्ट्रातील प्रत्येक जैन घराघरांत पोहोचलेले आहे. या मासिकाला प्रशंसा आणि अनुमोदनासह त्यांनी आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या आहेत. या शुभेच्छापत्र वाचनानंतर स्नेहा बाठिया यांनी आपल्या आई-वडिलांप्रती गौरवोद्‌गार काढले आहेत. धर्मचेतना आणि सुसंस्कारांची सुमने त्यांनी आम्हा मुलांच्या ओंजळीत घातली आहेत, त्यामुळेच आज आम्ही एका वेगळ्या स्थानावर आहोत, हे त्यांनी आवर्जून सांगितले.

जितो ॲपेक्सचे व्हॉईस प्रेसिडेंट श्री विजयजी भंडारी यावेळी म्हणाले की, 'जैन जागृति'ने ५० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणे ही सामान्य बाब नाही. परिवर्तन जीवनाचा नियम आहे आणि 'जैन जागृति'ने तो अंगीकारला आहे. ब्लॅक आणि व्हॉईटच्या युगातून फोर कलरमध्ये या अंकाचे प्रिंटिंग आणि नंतर डिजिटलायजेशन हा मासिकाचा प्रवास बदल स्वीकारल्याचे प्रतिक आहे आणि हेच या अंकाचे यश आहे. जैन समाज चतुर आणि हुशाार आहे. हे ओळखून प्रत्येक लेख आणि बातमीचे प्रसारण करताना त्यातील दूरदृष्टी या अंकातून संपादकांच्या माध्यमातून दिसून येत आहे. मॅट्रोमोनी ते सोशिॲलिझम हे अंकाचे वैशिष्ट जैन बांधवांनी स्वीकारले असून, अंकाच्या पुढील वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या.

क्षेत्रपाल प्रतिष्ठान आणि गुरूआनंद तीर्थचे ट्रस्टी सी. ए. श्री. सतीशजी सुराणा यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, 'जैन जागृति'ला स्व. कांतिलालजी चोरडिया यांनी एका उंचीवर नेऊन ठेवले आहे आणि तेच कार्य आताचे संपादक संजय आणि सुनंदा

चोरडिया करीत आहेत. कांतिलालजी चोरडिया यांनी 'इवलेसे रोप दारी लाविले' मात्र, त्याचा 'वेलू गगनावरी'नेण्याचे काम आता या दोघा संपादकांनी केले आहे. या अंकाचे जैन धर्मामध्ये अढळस्थान आहे आणि त्यासाठी प्रमुख त्रीसूत्री कारण आहे. एक म्हणजे सामाजिक, धार्मिक घटनांना निस्पृहपणे दिलेली प्रसिद्धी, तरुण पिढीला व्यावसाय आणि शिक्षणाची दिलेली माहिती दुसरे म्हणजे निर्वादातित असे अंकाचे स्वरूप आणि अजातशत्रू अशी अंकाची असलेली ओळख आणि तिसरे म्हणजे अंकाच्या प्रकाशनाबाबतचे सातत्य, अखंडत्व... या त्रीसूत्रीमुळेच आज हा सोहळा ऐतिहासिक ठरतो आहे. चोरडिया घराण्याकडे बुद्धिमत्तेचा वारसा आहेच, तोच सागर आणि प्राचि या पिढीलाही मिळाला आहे. या सुवर्णमहोत्सवाची वाटचाल अमृत महोत्सवाकडे व्हावी, अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या.

भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतिलालजी मुथ्था यांनी 'जैन जागृति'ला शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, 'जैन जागृति'ने ५० वर्षांचा टप्पा पार करणे हे सध्याच्या काळात खरोखरच उल्लेखनीय आहे. यामागे चोरडिया घराण्याचे कर्तृत्व महत्त्वाचे आहे आणि त्यामुळेच आज आपण हा ऐतिहासिक क्षण अनुभवू शकत आहोत. स्व. कांतिलालजी चोरडिया आणि आता संजय चोरडिया यांची जैन समाजाबद्दलच्या तळमळीनेच आपणा सर्वांना येथे खेचून आणले आहे. वडिलांनी दिलेला लिखाणाचा आणि संस्कारांचा वारसा संजय चोरडिया यांनी जपला आहे, हे त्यांच्या सातत्यपूर्ण लिखाणातून दिसून येत आहे. गेल्या ५० वर्षांत या अंकाच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी कामे झाली आहेत, हे या अंकाचे यश आहे.

मान्यवरांच्या या भाषणांनंतर संपूर्ण सभागृहाने अनुभवला तो ऐतिहासिक क्षण... ज्याची सगळेचजण वाट पाहत होते. सुवर्णमहोत्सव अंकाचे प्रकाशन भारत वुलन हाऊसचे आणि 'जैन जागृति'चे गेली ४५ वर्षे जाहिरातदार असलेले श्री. रतनकुमार हेमराजजी कटारिया यांच्या हस्ते झाले आणि सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमले. हा प्रकाशनाचा ऐतिहासिक सोहळा सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

संपादक सुनंदा चोरडिया यांनी त्यांचे सासरे 'जैन जागृति'चे संस्थापक-संपादक स्व. कांतिलालजी चोरडिया यांच्या आणि 'जैन जागृति' बाबतच्या काही आठवणी आपल्या भाषणातून व्यक्त केल्या. लग्नानंतर चोरडिया घराण्यात आल्यावर सासरे कांतिलालजी चोरडिया यांच्या कार्याची जाणीव त्यांना झाली. शिक्षक, प्राध्यापक आणि संपादक असा त्यांचा प्रवास सुनंदा चोरडिया यांनी जवळून अनुभवला. हे मासिक सुरू करताना कांतिलालजी चोरडिया यांनी समाजातील प्रतिष्ठितांशी चर्चा केली होती. मात्र, चांगली नोकरी सोडून या कामाकडे वळावे याबाबत कोणीही अनुकूल नव्हते; पण कांतिलालजी चोरडिया यांनी आत्मविश्वासाने या क्षेत्रात पाऊल टाकले, सायकलवर फिरून, गावागावांत जाऊन प्रकाशनाआधीच त्यांनी ८०० सभासद मिळवले होते आणि पहिल्या अंकाचे संपादनाचे काम पूर्ण झाल्यावर पुण्यातील प्रभात प्रिंटिंग प्रेसमध्ये त्यांनी ११०० कॉपीजची ऑर्डर दिली तेव्हा त्या प्रेसचे मालक श्री. कनकभाई मुनोत यांना देखील त्यांचे काम पाहून आश्चर्य वाटले होते त्यांनी सांगितले की आजपर्यंत लोक वर्तमानपत्र किंवा मासिक छापतात व फुकट वाटतात व काही महिन्यानी ग्राहक बनवतात. पण तू अंक प्रकाशनापूर्वी एवढे ग्राहक बनवले. शब्बास! तु या कार्यात फार पुढे जाशिल आणि त्यांनी कांतिलालजी चोरडिया यांच्या कामाचे स्वागतच केले होते. या कार्यात कांतिलालजी यांना त्यांचे भाऊ सुभाष चोरडिया, प्रवीण आणि संजय या त्यांच्या मुलांची साथ लाभली.

'जैन जागृति'चे काम उत्तरोउत्तर वाढतच होते. मात्र, कांतिलालजी चोरडिया यांच्या निधनानंतर हे मासिक सुरू राहणार का, याबाबत अनेकांच्या मनात

साशंकता होती आणि ती त्यांनी संजय आणि सुनंदा चोरडिया यांच्याकडे स्पष्टपणे व्यक्तही केली होती. सुवर्णमहोत्सव सोहळ्याच्या या रूपाने हा अंक सुरू राहणार का, या प्रश्नाचे उत्तर सर्वांनाच मिळाले आहे. या अंकाच्या माध्यमातून विविध निबंध स्पर्धा घेतल्या गेल्या, त्याला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसादही सुनंदा चोरडिया यांनी यावेळी सांगितला. याबरोबरच त्यांनी सांगितलेली एक आठवण सर्वांनाच आचंबित करून गेली. २६ जून २००४ ला एक जैन मुनी त्यांच्या घरी पगलिया करण्यासाठी आले आणि त्यांनी सांगितले की 'जैन जागृति' मासिक वाचून या अंकातील 'जीनवाणी'ने प्रेरित होऊन त्यांनी दीक्षा घेतली आहे. आता पुण्यात आले असल्याने आवर्जून 'जैन जागृति'च्या संपादकांना ते भेटायला आले होते. सुनंदा चोरडिया यांनी ही आठवण सांगितल्यानंतर सभागृहात खरोखरच टाळ्यांच्या कडकडाटात पुन्हा एकदा दुमदुमले. आजही अनेक जैन गुरूदेवांकडे या अंकाचे नित्य वाचन होते. 'जैन जागृति'च्या लेखांच्या आणि बातम्यांच्या माध्यमातून अल्पसंख्याक योगदान मिळावे, यासाठी एक चळवळच उभी केली होती आणि या कार्याची दखल घेत आपणा सर्वांना अल्पसंख्य दर्जा तत्कालिन केंद्र सरकारने दिला आहे. याबरोबरच दर दहा वर्षांनी होणाऱ्या जनगणनेच्या फॉर्ममध्ये धर्माच्या रकान्यात 'जैन'असे लिहिण्याचा आग्रह सातत्याने 'जैन जागृति'ने करून याबाबतही जनजागृती केली आहे. 'जैन जागृति'च्या कार्यात लेखक, प्रतिनीधी, जाहिरातदार, ग्राहक 'जैन जागृति'चा स्टाफ आणि इतरही अनेक जण निगडित आहेत, या सर्वांचे आभार या कार्यक्रमात संपादक सुनंदा चोरडिया यांनी मानले.

क्रेडाई नॅशनलचे व्हॉईस प्रेसिडेंट श्री. शांतिलालजी कटारिया यांनी अत्यंत खुमासदार शैलीत आपले मनोगत व्यक्त केले. स्व. कांतिलालजी चोरडिया यांनी ५० वर्षांपूर्वी प्रेम आणि रोखठोकपणा यांचा समन्वय साधत 'जैन जागृति'ची निर्मिती केली. 'जैन जागृति' या नावातच खूप काही दडलेले आहे आणि हे नाव मासिकाला देण्यात कांतिलालजी चोरडिया यांच्या दूरदृष्टीची जाणीव होते. यामध्ये कल्पकता तर आहेच; पण एक व्हिजन आहे, जे जैन धर्माशी निगडित आहे. कर्मनिष्ठा, धर्मनिष्ठा आणि समाजनिष्ठा यांचा संगम यात दिसून येतो. स्वतःच्या व्यवसायासाठी ५० वर्षांपूर्वी प्रकाशन क्षेत्रात उतरून एक मोठे धाडस केले होते. समाजाची उतराई आणि व्यवसाय यांचा हा समन्वय होता. पुणे या बुद्धिवंतांच्या शहरात 'जैन जागृति' मासिक ५० वर्षे चालवणे हे खरोखरीच कसोटीचे काम असून याचे श्रेय कांतिलालजी आणि संजय चोरडिया यांचेच आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातही या अंकाची चर्चा असते. 'जैन जागृति'च्या मुखपृष्ठावर आपले नाव अथवा छायाचित्र येणे म्हणजे 'भारतरत्न' मिळाल्याचा आनंद जैनबांधवांमध्ये असतो, हे सांगण्यासही ते विसरले नाहीत. अर्थात याला कारण म्हणजे 'रोखठोक'पणा हे तत्त्व 'जैन जागृति'ने आजही जपलेले आहे. सकारात्मकता हा कांतिलालजी चोरडिया यांचा स्थायीभाव होता, त्यामुळेच जैन धर्माच्या चारही पंथांत ते सहज मिसळून गेले. पुण्यातील ऋतुराज सोसायटीतील जैन मंदिराच्या उभारणीत त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. हे मंदिर व्हावे यासाठी त्यांनी केलेला पाठपुरावा उल्लेखनीय आहे. समाजाला सहज उपलब्ध होणारी व्यक्ती जेव्हा डोळ्यासमोर येते तेव्हा कांतिलालजी आणि संजयजी चोरडिया यांचेच नाव पुढे येते. यशस्वी वडिलांचा वारसा चालवणे अवघड काम असते; पण हे शिवधनुष्य संजय चोरडिया यांनी लिलया पेलले आहे. आपल्याकडे एक म्हण आहे... 'बाप से बेटा सवाई' ही म्हण चोरडिया कुटुंबाने तंतोतंत खरी करून दाखवली आहे. कांतिलालजी - संजयजी आणि सागर - यांनी हे संस्कारी वारसा ठरले आहेत असे

सांगून शांतिलाल कटारिया यांनी 'जैन जागृति'च्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

बिझनेस कोच चकोर गांधी यांनी 'जैन जागृति'ला शुभेच्छा देताना सांगितले की, 'जैन जागृति' हे एक केवळ मासिक नसून ती एक संस्था आहे. ५० वर्षे एखादे मासिक एका विशिष्ट समाजाच्या उन्नतीसाठी चालवणे हा ध्येयवेडेपणा असून स्व. कांतिलालजी चोरडिया यांच्याबरोबरच त्यांच्या मुलांनीही या ध्येयवेडेपणात स्वतःला झोकून दिले आहे. हे जैन धर्माचे संस्कार आहेत. या अंकाच्या संपादक सुनंदा चोरडिया म्हणजे नारीशक्तीचे उत्तम उदाहरण आहे. अंकाच्या संपादनाच्या कार्याबरोबरच वेबसाईटची जबाबदारीही त्यांनी अत्यंत कौशल्याने सांभाळली आहे. फेसबुक आणि गुगल तर संजय चोरडिया यांच्या घरीच आहेत. हे एक धार्मिक आणि उच्चशिक्षित कुटुंब आहे. त्यांनी मनापासून जैन समाजाची सेवा केली आहे आणि हा सुवर्णमहोत्सव सोहळा म्हणजे त्यांच्या या सेवेचे यश आहे. धर्म आणि समाज यांना एकत्र आणण्याचे काम सातत्याने 'जैन जागृति'ने केले आहे. येणारी पिढी म्हणजेच सागर आणि प्राचि देखील 'जैन जागृति'चे नाव परदेशातही यशस्वी करतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

१५ ऑगस्ट १९६९ साली सुरू झालेल्या 'जैन जागृति'चा पन्नास वर्षांचा संपूर्ण चढता आलेख या कार्यक्रमाच्या नंतरच्या टप्प्यात व्हीडीओच्या (दृक्-श्राव्य) माध्यमातून उपस्थितांच्या समोर आला आणि चोरडिया कुटुंबाचे अनेकविध पैलू या व्हीडीओच्या माध्यमातून समोर आले. 'जैन जागृति'चे काही विशेष अंक आणि या अंकाच्या यशस्वीतेचे रहस्यच या व्हीडीओच्या माध्यमातून दाखवण्यात आले. यावेळी युवाचार्य श्री महेंद्रऋषिजी म.सा आणि आचार्य सम्राट डॉ. श्री. शिवमुनीजी म. सा. यांचे संदेश या व्हीडीओचे वेगळेपण दाखवून गेले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष असलेले अखिल भारतीय श्वेतांबर जैन कॉन्फरन्सचे अध्यक्ष श्री. पारसजी मोदी यांनी 'जैन जागृति'ला शुभेच्छा दिल्या. 'जैन जागृति'च्या योगदानात संपादक संजय चोरडिया आणि सुनंदा चोरडिया या दोघांचेही योगदान महत्त्वाचे आहे. जैन समाजाच्या चारही संप्रदायांना एकत्र आणून त्यांच्यात जैनत्वाची जागरूकता आणण्याचे काम 'जैन जागृति'ने म्हणजेच अर्थात स्व. कांतिलालजी चोरडिया आणि संजय चोरडिया यांनी केले आहे. गेल्या ५० वर्षांतील अखंड कार्य हे 'जैन जागृति'चे अधिष्ठान आहे आणि हेच या अंकाचे यश आहे. पुढील काळातही डायमंड ज्युबिलीकडे वाटचाल करताना 'जैन जागृति'चे कार्य तितक्याच सातत्याने आणि अखंडपणे होईल, अशी आशा यावेळी श्री. पारसजी मोदी यांनी व्यक्त केली.

यानंतर संजय चोरडिया यांच्या कन्या सौ. स्नेहा बाठिया यांच्या परिवारा तर्फे संजय आणि सुनंदा चोरडिया यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याचबरोबर कार्यक्रमास उपस्थित असलेल्या अनेकांनी या उभयंतांचा सत्कार केला. जवळपास अडीच तास चाललेल्या या कार्यक्रमास तुफान पाऊस असूनही प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता आणि विशेष म्हणजे शेवटपर्यंत सर्वजण उत्सकुतेने कार्यक्रमाचा आनंद घेत होते. सागर चोरडिया यांनी कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन सौ. रत्ना दहिवलकर यांनी केले.

या कार्यक्रमानंतर सर्वांनी स्नेह भोजनाचा लाभ घेतला. 'जैन जागृति'च्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाची दखल पुण्यातील सकाळ, लोकमत, प्रभात, संध्यानंद, आज का आनंद, महाराष्ट्र टाईम्स, पुढारी सह सर्व वर्तमानपत्रांनी घेतली आहे व तसेच दूरदर्शनच्या सह्याद्री चॅनलवर ५ मिनीटाची न्यूजही दाखविली. महाराष्ट्रातील व भारतातील विविध मासिकांत बातम्या प्रसिद्ध झाल्या. •

## कव्हर तपशील - डिसेंबर २०१९



### ❖ जैन जागृति सुवर्ण महोत्सव

जैन जागृति मासिकाचा सुवर्ण महोत्सव २० ऑक्टोबर २०१९ रोजी पुणे येथे भव्य कार्यक्रमात संपन्न झाला. या कार्यक्रमात सुवर्ण महोत्सव अंकाचे प्रकाशन जैन जागृति मासिकाचे सलग ४५ वर्ष जाहिरातदार भारत वूलन हाऊसचे श्री. रतनकुमार हेमराजजी कटारिया यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले. फोटोत डावीकडून जितो रेस्ट ऑफ महाराष्ट्रचे चेअरमन श्री. राजेशजी सांकला, जितो अॅपेक्सचे व्हाईस प्रेसिडेंट श्री. विजयजी भंडारी, क्रेडाई नॅशनलचे व्हाईस प्रेसिडेन्ट श्री. शांतीलालजी कटारिया, सकल जैन संघाचे प्रेसिडेन्ट श्री. विजयकांतजी कोठारी, क्षेत्रपाल प्रतिष्ठान व गुरु आनंद तीर्थचे ट्रस्टी श्री. सतीशजी सुराणा, अ.भा.श्वे.स्था. जैन कॉन्फरन्सचे अध्यक्ष श्री. पारसजी मोदी, भारतीय जैन संघटनाचे संस्थापक श्री. शांतीलालजी मुथा, जैन जागृतिचे संपादक श्री. संजयजी चोरडिया, संपादिका सौ. सुनंदाजी चोरडिया, भारत वूलन हाऊसचे श्री. रतनकुमारजी कटारिया, बिझनेस कोच श्री. चकोरजी गांधी, पूना मर्चन्ट चेंबरचे मा. प्रेसिडेन्ट श्री. राजेंद्रजी बाठीया, जैन युवक महासंघाचे प्रेसिडेन्ट श्री. अचलजी जैन, पुणे मनपाचे नगरसेवक श्री. प्रवीणजी चोरबेले इत्यादी.

### ❖ श्री. विजयकांतजी कोठारी, पुणे

सकल जैन समाज पुणेचे अध्यक्ष विजयकांतजी कोठारी यांना ओम अर्हम् ग्रुप, सकल जैन संघ आणि विजयकांतजी कोठारी जीवन गौरव समितीच्या वतीने रविवार दि. २० ऑक्टोबर २०१९ रोजी 'क्रांतिकारी समाजसेवी' या पुरस्कारने गौरवण्यात आले. पुरस्कार देताना श्री. शांतीलालजी कवाड, डॉ. के. एच. संचेती, श्री. प्रकाशजी धारीवाल, श्री. विजयजी भंडारी, सौ. राजश्री पारख, श्री. राजेशजी सांकला, श्री. वालचंदजी संचेती, श्री. लखीचंदजी खिंवसरा, श्री. अविनाशजी चोरडिया व श्री. अभयजी लुणावत इ.

### ❖ श्री. राजेशजी सांकला, पुणे – समाजभूषण

पुणे येथील प्रसिद्ध उद्योगपती व समाजिक कार्यकर्ते श्री. राजेशजी नौपतलालजी सांकला यांना जय आनंद ग्रुप तर्फे भव्य कार्यक्रमात समाजभूषण पुरस्कार देण्यात आले.

जितो अॅपेक्सचे अध्यक्ष श्री. गणपतराजजी चौधरी, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष श्री. अशोकजी गोडसे, श्री भाऊसाहेब भोईर, श्री. विजयकांतजी कोठारी, श्री. विजयजी भंडारी, जय आनंद ग्रुपचे अध्यक्ष श्री अशोकजी लोढा या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

### ❖ दादावाडी, पुणे – नव्वाणु भावयात्रा

सारसबाग पुणे, येथील दादावाडीत श्री शंत्रुजय गिरीराजची भव्य प्रतिकृती आहे. रांका ज्वेलर्सचे संचालक श्री. ओमप्रकाशजी रांका परिवारांतर्फे आचार्य देव श्री विश्वरत्नसूरिश्वरजी म.सा. यांच्या पावन सान्निध्यात १२ दिवसीय नव्वाणु यात्रेचे आयोजन करण्यात आले. यात सुमारे ५०४ भाविकांनी सहभाग घेतला. यावेळी धार्मिक विधी करताना श्री. ओमप्रकाशजी रांका, श्री. वस्तुपालजी रांका व रांका परिवार

## ❖ आनंद दरबार – कात्रज, पुणे

कात्रज पुणे येथील आनंद दरबार मध्ये आनंदरत्न जैन स्थानक, उभारण्यात आले आहे. या स्थानक भवनाचे उद्घाटन आचार्य श्री शिवमुनिजी म. सा., युवाचार्य श्री महेन्द्रऋषिजी म. सा. आदि ठाणा यांच्या सानिध्यात संपन्न झाला. यावेळी मातोश्री आनंदीबाई रतनचंदजी धोका या प्रवचन हॉलचे उद्घाटन आनंदीबाई धोका, श्री बाळासाहेब धोका, धोका परिवाराच्या हस्ते व श्री. राजेशजी सांकला, श्री. विजयजी भंडारी, श्री रमणलालजी लुंकड, श्री. लखीचंदजी खिंवसरा, श्री. प्रवीणजी चोरबेले, श्री. मोहनलालजी गदिया, श्री. अभयजी संचेती इ. मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

## ❖ सिद्धी फाऊंडेशन, पुणे – पुरस्कार

सकल जैन समाजातर्फे गत दहा वर्षे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करुन हजारो बाटल्या रक्त संकलन केल्याबद्दल सिद्धी फाऊंडेशन, पुणे यांना ''रक्तदान शिबीर महर्षी'' उपाधी देऊन गौरवण्यात आले. सिद्धी ग्रुपचे श्री. मनोज छाजेड, श्री. ललित जैन यांना सकल जैन संघाचे श्री. विजयकांतजी कोठारी, श्री. राजेशजी सांकला, श्री. पोपटलालजी ओस्तवाल, श्री. विजयजी भंडारी यांच्या हस्ते पारितोषीक देण्यात आले.

## ❖ जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय महिला अधिवेशन, पुणे

जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय महिला अधिवेशन ४ व ५ ऑक्टोबर रोजी आचार्य श्री. शिवमुनिजी म.सा. युवाचार्य श्री. महेद्रऋषिजी म.सा. आदि संत-संतिया यांच्या सानिध्यात पुणे येथे संपन्न झाले. ५ ऑक्टोबर रोजी प्रथम महिला गव्हर्नर किरणजी बेदी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. किरण बेदी यांचा सन्मान करताना राष्ट्रीय महिला अध्यक्ष सौ. विमल सुदर्शनजी बाफना, सौ. ज्योती गांधी, सौ. सुषमा लुंकड, सौ. निरंजना चुत्तर इ. मान्यवर

## ❖ सौ. मनिषा दुगड, लोटस खाकरा – पुरस्कार

लोटस खाकराच्या संचालिका सौ. मनिषा कल्पेशजी दुगड यांना सकाळ एक्सलन्स २०१९चा ॲवार्ड सकाळचे अध्यक्ष श्री. प्रतापराव पवार यांच्या शुभहस्ते देण्यात आला. फोटोमध्ये डावीकडून श्री. कल्पेशजी दुगड, श्री. प्रतापराव पवार, सौ. मनिषा दुगड, पोलिस सह आयुक्त डॉ. रविंद्र शिसवे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी इ.

## ❖ श्री. रतीलालजी चोरडिया, पुणे

निगडी पुणे येथील श्री. रतीलालजी फुलचंदजी चोरडिया यांचा अमृत महोत्सव व श्री. रतीलालजी व सौ. प्रमिला यांच्या लग्नाचा सुवर्ण महोत्सव १२ ऑक्टोबर २०१९ रोजी साजरा करण्यात आला. यावेळी फोटोमध्ये डावीकडून श्री. संजय भंडारी, चि. ओम भंडारी, डॉ. कु. सलोनी भंडारी, श्री. रतीलाल चोरडिया, सौ. सचिता भंडारी, सौ. प्रमिला चोरडिया, कु. सजली भंडारी

## ❖ रतनलाल सी. बाफना ज्वेलर्स, पुणे

सुवर्ण अलंकारचे 'स्वर्णतीर्थ' अशी संपूर्ण भारतवर्षात ओळख बनविलेल्या श्री. रतनलाल सी. बाफना ज्वेलर्सचे भव्य शोरुम नळस्टॉप, पुणे येथे सुरु झाले आहे. यावेळी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून बाफना परिवाराला शुभेच्छा दिल्या.


**सुसंस्कार व सदाचारासाठी 'जैन जागृति' नियमित वाचा**

**आपले नातेवाईक, स्नेहीजण, व्यापारी बंधू यांना 'जैन जागृति' मासिक भेट पाठवा.**

**जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर**

| | |
|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० |
| त्रिवार्षिक | रु. १३५० |
| वार्षिक | रु. ५०० |

कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते. **'जैन जागृति'** नावाने वर्गणी पाठवा.